गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ११० वा ● शुक्रवार ०६ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 110 | Date : 06/09/2024 | blow Friday |Page 4 Price 4

# राज्यातील विविध देवस्थानांच्या २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना शिखर समितीची मंजूरी

## ग्रामीण महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाला मिळेल चालना; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला विश्वास

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्र्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक आज मंत्रालयात झाली. बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, यंदाचे वर्ष हे श्री चक्रधर स्वामींचे अष्टशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. तसेच आज त्यांची जयंती आहे, यानिमित्ताने महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भक्तीधाम प्रल्हादपूर येथील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, यासाठी दोन टप्प्यात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच संत सावता माळी यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील अरण या गावाला अ वर्ग तीर्थक्षेत्र जाहीर करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.या बैठकीत ग्रामविकास विभागाच्या अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी, बीड जिल्ह्यातील श्री पांचाळेश्र्वर तीर्थक्षेत्रासाठी ७ कोटी ९० लाख, श्री क्षेत्र पोहीचा देव तीर्थक्षेत्रासाठी ४ कोटी ५४ लाख, जालना जिल्ह्यातील जाळीचा देव तीर्थक्षेत्रासाठी २३ कोटी ९९ लाखाच्या वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींच्या आणि कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे येथील शिव पार्वती तलावाच्या सुशोभीकरणासाठी १४ कोटी ९७ लाखाच्या निधीला मंजूरी देण्यात आली.

### ‘उजनी’ च्या २८३ कोटींच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला शिखर समितीची मान्यता

*** कृषी, जल, निसर्ग, धार्मिक पर्यटनासह विनयार्ड पर्यटनाला मिळणार चालना * कोयना नदीतील जलपर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार * राज्यातील पर्यटन वाढीसह स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळणार**

मुंबई : पर्यटन विकासाला चालना देण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या उजनी (जि. सोलापूर) धरण परिसरातील २८२.७५ कोटी रुपयांच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याला देखील आज शिखर समितीने मान्यता दिली. या निर्णयामुळे उजनी धरण परिसरातल्या पर्यटन विकासाला



चालना मिळणार आहे. तसेच सातारा जिल्ह्यातील पश्र्चिम घाट परिसरातील एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत कोयना हेळवाक वन झोनच्या वाढीव ६७.८५ कोटी रुपयांच्या कामासह लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत मंजूर कामांवरील वाढीव ६४.८३ कोटी रुपयांच्या मागणीला सुध्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने आज मान्यता दिली.

या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन विकासाला गती मिळणार आहे.

शिखर समितीच्या बैठकीत राज्यातील विविध प्रस्तावांसह उजनीच्या एकात्मिक विकास आराखड्यासह सातारा, लोणार विकास आराखड्यातील वाढीव कामांना मंजूरी देण्यात आली. राज्याच्या विकासाचे मोठे आराखडे अंमलबजावणीसाठी नियोजन विभागाकडे सोपविण्यात आले आहेत. मात्र या आराखड्यांच्या कामाची अंमलबजावणी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत करण्यात येते.

शिखर समितीच्या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील उजनीच्या एकात्मिक विकास आराखड्यासाठी २८२.७५ कोटी रुपयांच्या आराखड्यास । पान २ वर

# अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीच्या मदतीसाठी ३०७ कोटी २५ लाखांपेक्षा निधी वितरणास मान्यता

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : राज्यात नोव्हेंबर, २०२३ ते जुलै, २०२४ या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यात अवेळी पावसामुळे, अतिवृष्टीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानापोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने तीनशे सात कोटी पंचवीस लक्ष एकोणतीस हजाराच्या मदतीचा निधी वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे.या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यांना मदत व दिलासा मिळणार असून याबाबतचा शासन निर्णय आज ५ सप्टेंबर २०२४ रोजी जारी करण्यात आला आहे, अशी माहिती मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी दिली.

मदत, पुनर्वसन मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले, दि.२२.६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे. त्यानुसार नोव्हेंबर, २०२३ मधील अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या व त्यापुढील कालावधीसाठी अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे. यापूर्वी दि.१० जानेवारी २०२४ व दि.३१ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार अनुक्रमे रु.१४४.१० कोटी व रु. २१ हजार ०९.१२ कोटी इतका निधी नोव्हेंबर व डिसेंबर २०२३ या कालावधीत अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपीक नुकसानीकरिता मदत मंजूर करण्यात आलेली आहे. तसेच दि.२ ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जानेवारी, २०२४ ते मे, २०२४ या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यात अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी रु.५९६.२१ कोटी इतकी मदत मंजूर करण्यात आलेली आहे.

# इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत महाराष्ट्र अग्रेसर राज्य होणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पुणे, पनवेल येथे १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित ४ विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मान्यता दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. या प्रकल्पांमुळे सुमारे २९ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. आज मान्यता दिलेल्या प्रकल्पांमुळे राज्यात सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रीक वाहन निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होणार असल्याचे । पान २ वर

# कामगारांसाठी राज्यात ३०४ सेतू केंद्र : कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे

### कामगार कल्याणकारी मंडळाच्या तालुकास्तरीय सेतु केंद्राचे मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक यशसिद्धी न्युज**



मुंबई : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने एक नवीन प्रकल्प राबविण्यात आला आहे. तालुक्याच्या ठिकाणी जे बांधकाम कामगार आहेत त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन नोंदणी करावी लागते. रोजंदारी कामगार असल्याने त्यांचा तो दिवस खाडा पडतो. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी ‘तालुका कामगार सुविधा केंद्र’ अर्थात सेतू केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आज राज्यात ३५८ सेतू केंद्र चालू करावयाचे असून यातील ३०४ सेतू केंद्राचे आज ऑनलाईन उद्धाटन केले असल्याची माहिती कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे यांनी दिली.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सेतू केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार संजय राठोड, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार उपस्थित होते.कामगार मंत्री डॉ.खाडे म्हणाले की, कामगारांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्या, तर त्यांनी या हक्काच्या सेतूमध्ये येऊन नोंदणी किंवा अन्य सोयी सुविधा देण्यासाठी हे सेतू केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचबरोबर कामगारांना ज्या सुविधा देण्यात येतात, त्याबाबतची पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याचीही माहिती । पान २ वर

# दीपक देशमुख यांना ‘ईडी’कडून अटक; ‘मायणी वैद्यकीय’ गैरव्यवहार प्रकरण

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सातारा : मायणी वैद्यकीय महाविद्यालय फसवणुकीच्या गुन्ह्यात दीपक देशमुख यांना अंमलबजावणी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) पथकाने गुरुवारी अटक केली. साताऱ्यात पोलीस मुख्यालय परिसरात ही कारवाई केली. मायणी वैद्यकीय महाविद्यालय अपहारप्रकरणी देशमुख यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल झालेले आहेत. याप्रकरणी वडूज पोलीस ठाण्यातून सातारा आर्थिक गुन्हे शाखा येथे गुन्ह्याचा तपास वर्ग करण्यात आला आहे. काही गुन्हे ईडीकडे वर्ग झाले आहेत.

दीपक देशमुख यांच्याविरुद्ध




मायणी वैद्यकीय महाविद्यालयातील भ्रष्टाचारप्रकरणी २०२३ साली फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्याचा तपास सातारा आर्थिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी भोसले करत आहेत. देशमुख यांना या गुन्ह्यात सातारा आर्थिक गुन्हे शाखेत तपासासाठी हजर राहण्यासह अटी आणि शर्तीवर उच्च न्यायालयात जामीन मिळाला आहे. दरम्यान यातीलच काही गुन्ह्यांचा तपास ‘ईडी’तर्फेही सुरू आहे. यातील सातारा पोलिसांकडे सुरू असलेल्या चौकशीसाठी देशमुख सातारा । पान २ वर

# वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने जनसंवाद यात्रेचे आयोजन

**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः १ ऑगष्ट २०२४ रोजी सुप्रिम कोर्टाने एससी, एसटी मध्ये वर्गीकरण करने आणि क्रिमीलिअर लावणे अशा प्रकारचा आदेश राज्यांना दिलेला असुन सुप्रिम कोर्टाच्या माध्यमातून हा एससी, एसटीचे आरक्षण संपविण्याचा डाव ईथल्या व्यवस्थेने आखलेला आहे. या बाबतची जनजागृती लोकांमध्ये व्हावा आणि त्याच प्रमाणे ओबीसी बांधवाचे आरक्षण सुध्दा संपण्याच्या मार्गावर आहे त्यांना ही जागृत करावा आणि महत्वाचे या विषयावर सत्ताधारी पक्षा आणि विरोधी पक्षाच्या एकाही नेत्याने आपले मत व्यक्त केलेले नाही. आदरणीय बाळासाहेब आंबेडकर व वंचित बहुजन आघाडीची भुमिका सुरवातीच्या काळापासून अगदी स्पष्ट आहे. गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावा आणि ओबीसीचे ताट वेगळे असावे या बाबत ठोस भुमिका फक्त वंचित बहुजन आघाडीनेच घेतलेली आहे. महाराष्ट्रामध्ये दोन समाजामध्ये तेढ निर्माण करुन दंगली घडविण्याचा कट रचण्यात आला होता तो मोडून काढण्यासाठी महाराष्ट्रात शांतता व सुव्यवस्था नांदण्यासाठी आदरणीय बाळासाहेब आंबेडकर चार हजार कि.मी.चा प्रवास करुन आरक्षण बचाव यात्रा काढली. आणि एससी, एसटी, व ओबीसी यांचे आरक्षण वाचविण्यासाठी महाराष्ट्रातल्या सर्व जिल्हयामध्ये आरक्षण बचाव यात्रेची सभा घेण्यात आली. आरक्षण संपविण्याचा कट इथल्या व्यवस्थेने आखलेले असतांना या सर्व समाजामध्ये जन जागृती व्हावी, जनतेला सत्य कळावे या हेतुने रविवार दि.०८ सप्टेंबर रोजी अक्कलकोटच्या वंचित बहुजन आघाडीच्या सर्व विभागाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद गटातील गांवामध्ये जन संवाद यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेची सुरुवात अक्कलकोट भिमनगर पासुन व अक्कलकोट शहरातील प्रमुख मार्गावरुन या यात्रेचे रॅली ने हसापूर येथे समारोप होईल.

यात्रेमध्ये एससी, एसटी, ओबीसी व गरीब मराठा आणि सर्व आरक्षणवादयांनी मोठया संख्येने या यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनसेच्या वतीने दिलीप धोत्रे यांच्याकडून डॉक्टरांचा सन्मान

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर व तालुक्यातील रुग्णांना अत्याधुनिक उपचारासाठी घेण्यासाठी पुणे मुंबई मिरज अशा ठिकाणी जावे लागते नातेवाईकांना रुग्णांना त्रास सहन करावा लागतो म्हणून पंढरपुरातील डॉक्टरांनी अत्याधुनिक हॉस्पिटल उभे करावे असे वक्तव्य श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाने चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले . रुग्णावर उपचार करून रुग्णांना बरे करून त्यांना घरी पाठवतात पण त्या डॉक्टरांचा पुणे सन्मान व गौरव करत नाहीत म्हणून मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपुरातील डॉक्टरांचा सन्मान कार्यक्रम आयोजित केला होता कोरोना मध्ये महाभयंकर परिस्थिती असताना डॉक्टरांनी कोरोना मध्ये अनेक रुग्णावर उपचार करून त्यांना



घरी पाठवण्यात आले पण डॉक्टरांचा कोणी सन्मान व गौरव केलेला नाही मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी अतिशय स्तुत्य उपक्रम राबवून डॉक्टरचा सन्मान केला असे असे मत अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले. पंढरपूर मध्ये आत्या आधुनिक हॉस्पिटल नसल्यामुळे सोलापूर पुणे मुंबई मिरज अशा ठिकाणी रुग्णांना जावे लागते व त्यांच्या नातेवाईकांना जावे लागते त्यांच्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागतो त्यासाठी पंढरपुरात अत्याधुनिक हॉस्पिटल जर तयार केले येथेच उपचार घेण्यासाठी बाहेरून रुग्ण व त्यांचे नातेवाईक येतील त्यामुळे येथील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी हॉटेल व्यवसाय मेडिकल रिक्षावाले असे सर्वांना आर्थिक मदत होणार आहे त्यासाठी पंढरपूर मध्ये अत्याधुनिक हॉस्पिटल डॉक्टर नाही उभे करावे अशी मत अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले

# संपादकीय

## याची खंत वाटते...

महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपून काढले. बहुतांश ठिकाणी अतिवृष्टी झाली. नद्यांच्या पुराचे पाणी नदीकाठच्या शेतांमध्ये पसरुन शेतीपिकांची प्रचंड हानी झाली. ओढे, नाले आणि नद्यांना आलेल्या पुरामध्ये बारापेक्षा अधिक लोक वाहून गेले, जनावरांचेही नुकसान झाले. हाताशी आलेली पिके डोळ्यादेखत वाहून गेल्याने बळीराजा पुरता खचून गेला आहे. कष्टाने आणलेली पिके निसर्गाने हिरावून नेली. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी तर कधी सरकारी धोरणांमुळे शेतकऱ्यांवर अरिष्ट कोसळते. या सर्व संकटांवर मात करणारा शेतकरी कर्जाच्या खाईतून वर येण्यास तयार नाही. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसामुळे राज्यातील ३६ पैकी २५ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. विदर्भातील ९७ हजार ६५२ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली. मराठवाड्यातही लाखो हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नासाडी झाली. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली, तर काही भागामध्ये पुराचे पाणी घुसल्यामुळे लोकांच्या राहाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठवाडा तसा दुष्काळी भाग, याच भागात गेल्या वर्षी कमी पावसामुळे पिण्याच्या पाण्याची भीषण परिस्थिती उद्भवली होती. काही वर्षांपूर्वी पाण्याचे स्रोत अटल्याने लातूरला रेल्वेने पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर आली होती. गतवर्षीही पंधरा ते वीस दिवसांआड लातूरला पाणीपुरवठा करावा लागला. यंदा लातूर, धाराशिव, बीड, परभणी, नांदेड या भागावर पावसाने आभाळमाया केली. आभाळ फाटावे तसा या भागात पाऊस कोसळला. गेल्या पंधरा ते वीस दिवसांत झालेल्या पावसामुळे पाझर तलाव, धरणे भरुन वाहू लागली. पिकेही जोमदार आली होती, उत्पन्न हाती येणार असे वाटत असतानाच उडीद, सोयाबीन, मूग, तूर, सूर्यफूल आदी पिकांचे न भरुन येणारे नुकसान झाले. राज्यातील सर्व जनता गणेशोत्सवाच्या तयारीला लागली असताना मराठवाडा आणि विदर्भातील जनता मात्र आक्रोश करत बसली आहे. महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार 'लाडकी बहीण' योजनेचे श्रेय लाटण्यामध्ये गुंतले आहे. जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये मेळावे घेऊन आपले उमेदवार निवडून आणण्याची त्यांना घाई लागली आहे. वास्तविक पाहाता जिल्हा प्रशासन व कृषी विभागाकडून माहिती प्राप्त करुन तत्काळ या शेतकऱ्यांना मदत देण्याची घोषणा सरकारने करायला हवी होती. बळीराजा हा अन्नदाता आहे. शेतकरी सुखी तर सर्वजण सुखी, असे म्हणणे सोपे आहे. परंतु, त्याच्या संकटकाळात धावून न जाणे हा कृतघ्नपणा आहे. विरोधी पक्षाचे नेते नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. परंतु, अजूनही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला नाही, याची खंत वाटते.

# उपक्रमशील शिक्षक : बाबासाहेब बनसोडे(मुंदिंनकेरी)गुरुजी....

**दैनिक यशसिद्धी न्युज**

५ सप्टेंबर शिक्षक दिन. आपणास सह माझ्या असंख्य शिक्षक बंधू बहिणींना शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा...

वागदरी सारख्या ग्रामीण भागामध्ये गोरगरीब कुटुंबामध्ये जन्माला येऊन लोकसेवेचा, समाजसेवेचा मापदंड निर्माण करणारे, समाजसेवी व्यक्तिमत्व म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा वागदरीचे नूतन मुख्याध्यापक श्री. बाबासाहेब बनसोडे गुरुजी. विश्र्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यातून, विचारातून प्रेरणा घेऊन त्यांच्या मातापित्यानी त्यांचे नामकरण बाबासाहेब असे केले.. आणि श्री. बाबासाहेब बनसोडे गुरुजी हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या विचारावर, त्यांच्या मार्गावर चालण्याचा मनोभावे प्रयत्न करत असतात. त्यांचे शैक्षणिक ,सामाजिक क्षेत्रातील कार्य हे अतिशय उत्तुंग आहे. आपण स्वतः ज्या शाळेमध्ये शिक्षण घेतलं त्याच शाळेमध्ये शिक्षक म्हणून मुलांना शिकवण्याचं ज्ञानदान करण्याचं काम करणे हे खूप कमी लोकांच्या नशीबी येतं . ज्यांच्या नशीबी हे भाग्य आलं त्यातीलच एक म्हणजे श्री बाबासाहेब बनसोडे गुरुजी..




श्री बाबासाहेब बनसोडे गुरुजी यांच्या शैक्षणिक कार्याची सुरुवात ही २००३ मध्ये तत्कालीन औरंगाबाद व सध्याच्या छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील केकत जळगाव या गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षक म्हणून झाली. तेथे त्यांनी सलग सात वर्षे सेवा बजावली. तेथे बहुभाषिक शिक्षक या रूपाने नावाजले. त्यानंतर २०१० दहा मध्ये सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील पाचेगाव बुद्रुक भिडे वस्ती येथे त्यांची बदली झाली. ते २०१६ पर्यंत तेथे कार्यरत होते. या काळामध्ये शिक्षणाची गोडी नसलेल्या गावांमध्ये, आपल्या कला कौशल्याने त्या गावातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी रुजवली. शिक्षणाचे महत्त्व मुलांच्या पाल्याल्यासह इतर सर्वांना निदर्शनास आणून दिले .आणि बोटावरती विद्यार्थ्यांची पटसंख्या असलेल्या गावांमध्ये, शंभराच्या वरती मुलांची संख्या घेऊन गेले. तसेच ते ज्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करत होते, ती शाळा पूर्णपणे पत्र्याची होती, सर्व सोयी सुविधा पासून खूप दूर होती. गावामध्ये अंतर्गत गटबाजीच्या कारणावरून शाळेचा विकास होणे दुरापास्त होते. अशा काळामध्ये श्री बाबासाहेब बनसोडे गुरुजींनी गावकऱ्यांच्या मनामध्ये शाळेचे महत्त्व पटवून देऊन, त्यांच्यामध्ये सकारात्मकतेची भावना रुजवून समस्त ग्रामस्थ यांच्यासह गावपाटील, सरपंच यांना विश्र्वासात घेऊन व सांगोला तालुक्याचे तत्कालीन लोकसेवक आमदार श्री गणपतराव देशमुख साहेब यांना शाळेच्या अवस्थेची जाणीव करून देऊन, त्यांच्या माध्यमातून भरघोस निधी आणले. आणि त्या पाचेगाव बुद्रुक भिलेवस्ती मध्ये श्री बनसोडे गुरुजींच्या माध्यमातून शाळेची सुंदर अशी इमारत आकाराला आली.. नंतर लहान सहान कामे लोकसहभागातून गुरुजींनी करून घेतली. आणि त्या शाळेचे संपूर्ण रूपडे पालटून टाकले.. २०१६मध्ये श्री बनसोडे गुरुजींची जेव्हा बदली झाली.. तेव्हा त्या शाळेतील विद्यार्थ्यांसह संपूर्ण गावकरी बांधवांचे डोळे हे गुरुजींचा विरह होणार असल्यामुळे पाणावले. त्यांनी गुरुजींना साश्रू नयनांनी निरोप दिला...

श्री बनसोडे गुरुजी हे २०१६ मध्ये आपल्या अक्कलकोट तालुक्यातील गोगाव येथे बदलून आले... तेथे त्यांनी मुलांना शिक्षण देण्याबरोबरच सदर शाळेत दहा हजार रुपये खर्च करून शाळेची पूर्ण रंगरंगोटी करून घेतली.. गुरुजींची त्यानंतर २०२३मध्ये बोरोटी या गावी बदली झाली. आणि योगायोग म्हणजे त्या गावास आपल्या गावचे सुपुत्र श्री खराडे साहेब हे ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. खराडे साहेबांच्या सहकार्यातून २०२३ ते २०२४ या एका वर्षाच्या काळामध्ये गुरुजींनी सदर शाळेस प्रशस्त असे गेट बांधून घेतले मुला मुलींना शौचालयाची सोय करून घेतली. गुरुजींनी सदर शाळेचे रूपडे पालटून मुलांना शिक्षणाची गोडी निर्माण केली..

श्री.बनसोडे गुरुजी यांची बदली ही नुकतीच म्हणजे ऑगस्ट २०२४मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुलींची वागदरी येथे मुख्याध्यापक म्हणून झालेली आहे. मुख्याध्यापक म्हणून रुजू झालेल्या पहिल्या दिवसापासून श्री बनसोडे गुरुजी हे अतिशय आत्मीयतेने नम्रतेने आणि जबाबदारीने आपल्या कामास सुरुवात केली आहे .विशेष म्हणजे गुरुजी हे आल्याच्या दुसऱ्याच दिवशी गेल्या कित्येक दिवसापासून सदर शाळेच्या पत्र्यावरती दोन्ही बाजूला जो मोठ्या प्रमाणात कचरा साठला होता, झाडाचा पालापाचोळा साचला होता ,तो त्यांनी माणसे लावून काढून घेतला. सदर परिसराची स्वच्छता करून घेतली. गुरुजी आल्याच्या महिनाभराच्या काळामध्येच इयत्ता दुसरीच्या वर्गामध्ये आपले दानशूर बंधू श्री गोपाळ मुंदिंनकेरी यांच्याकडून ४२ इंची एलईडी टीव्ही बसवून घेतले. त्या कामी आपल्या गावचे सामाजिक कार्यकर्ते श्री. शरण सुरवसे यांचा देखील महत्त्वाचा वाटा आहे. आपल्या सहकारी शिक्षकांना विश्र्वासात घेऊन ते मुलांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना आपल्या इतर सह शिक्षकांचा देखील मोलाचा हातभार लागत आहे. ते बोलण्याच्या ओघात बोलून जातात की मी ज्या शाळेतून शिकलो, त्या शाळेमध्ये मुख्याध्यापक म्हणून मला काम करावयास मिळणार हे माझं परम भाग्य आहे. मी संधीचं सोनं करून दाखवेन, आपल्या गावच्या या शाळेचे रुपडं बदलेन.. आणि ही शाळा आदर्श शाळा म्हणून नावारूपास आणेन. आपल्या स्वप्नांना यशस्वीतेच फळ येऊ दे ही मनापासून सदिच्छा. श्री बनसोडे गुरुजी हे अतिशय नम्र स्वभावाचे आहेत... मूर्ती लहान पण कीर्ती महान असलेले व्यक्तिमत्व आहेत.

श्री बाबासाहेब बनसोडे गुरुजी यांचे समाजकार्य हे उदंड आहे. ते गोरगरीब घराण्यात जन्माला आल्यामुळे त्यांना सर्वसामान्याबद्दल कळवळा आहे, गरिबांबद्दल आपुलकी आहे,त्यातून ते अडलेल्या नडलेल्याना सतत मदतीचा हात देत असतात. ते सध्या ज्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून आहेत अशा प्राथमिक मराठी शाळा मुलींची वागदरी या शाळेस इडली बनवण्याचे पात्र जवळ जवळ ३००० रुपये चे ते स्वतः घेऊन दिलेले आहेत. तसेच आपल्या गावातील प्राथमिक कन्नड शाळेला जे गेट आहे. ते श्री बनसोडे गुरुजींनी स्वतः बांधून दिले आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवामध्ये ते हिरीरीने आपला सहभाग नोंदवतात. ते फक्त सहभाग नोंदवतच नाहीत तर त्यामध्ये अन्नदानासाठी मनापासून सहकार्य करतात.. आपण ज्या जातीतून ,ज्या समाजातून जन्माला आलो त्यासाठी काहीतरी केलं पाहिजे ही कृतज्ञतेची भावना ठेवून ते सर्वांना मदत करत असतात. असे हे संपूर्णपणे लोकसेवेला वाहिलेले व्यक्तिमत्व म्हणजेच श्री बाबासाहेब बनसोडे गुरुजी. गुरुजी आपल्या हातून लोकसेवा, समाजसेवा सतत घडत राहू दे. आपल्याहातून हे उच्च प्रतीचे ज्ञानदानाचे कार्य निरंतर चालत राहू दे .ही सदिच्छा व्यक्त करतो..**धन्यवाद.**

शब्दांकन:श्री.मारुती शिंदे...
मू पो वागदरी ता. अक्कलकोट

पान १ वरुन

## कामगारांसाठी राज्यात ३०४ सेतू..

देण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली.

मंत्री डॉ.खाडे पुढे म्हणाले की, बॉयलर इंडियाचे एक मोठे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन नवी मुंबईतील वाशी येथे २५,२६ आणि २७ सप्टेंबर २०२४ रोजी भरविण्यात येणार आहे. यामध्ये बॉयलरचे वेगवेगळे प्रकार, गुणवत्तेसोबतच परदेशातील बायलर पाहायला मिळेल व त्याबाबतचे मार्गदर्शन सुद्धा मिळणार आहे. या प्रदर्शनाकरिता देशातील मोठ्या बॉयलरधारक उद्योगांना आमंत्रित केले असल्याचे त्यांनी सांगितले.मंत्री डॉ.खाडे यांनी सांगितले की, कामगार न्यायालयातील न्यायाधीशांच्या वेतनाचा प्रश्र्न होता. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचे तंतोतत पालन करून त्यांच्या वेतनाचा प्रश्र्न मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आला आणि तो मंजूर झाला असल्याचीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

## दीपक देशमुख यांना 'ईडी'कडून

पोलीस मुख्यालय परिसरात आले असता 'ईडी'ने कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. या वेळी सुमारे दीड तास तेथे त्यांची चौकशी केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.मागील महिन्यात 'ईडी'च्या पथकाने देशमुख यांच्या मायणी येथील घरी छापा टाकला होता. दीपक देशमुख यांच्या विरुद्ध वडूज पोलीस ठाण्यात २०२३ साली एका संस्थेची जागा दुसऱ्या संस्थेला बक्षीसपत्राने देत बोगस दस्त केल्याचा गुन्हा दाखल आहे. यामध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार असल्याने हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासासाठी सोपवण्यात आले आहे. तसेच यातील काही गुन्ह्यांचा तपास 'ईडी'कडून स्वतंत्ररीत्या सुरू आहे.

## राज्यातील विविध देवस्थानांच्या २७५

मंजूरी देण्यात आली. यामध्ये धार्मिक पर्यटनासाठी २५ कोटी, जल पर्यटनासाठी १९०.१९ कोटी, कृषी पर्यटनासाठी १९.३० कोटी, विनयार्ड पर्यटनासाठी ४८.२६ कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजूरी देण्यात आली.सातारा जिल्ह्यातील पश्र्चिम घाट परिसरातील धार्मिक ऐतिहासिक व निसर्ग पर्यटन स्थळे एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत कोयना हेळवाक वन झोनच्या वाढीव कामासाठी ६७.८५ कोटी रुपयांना शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. तसेच बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकास आराखडा अंतर्गत वाढीव ६४.८३ कोटी कामांना मंजूरी देण्यात आली आहे. या कामांमध्ये सांडपाणी प्रक्रीया, भूमीगत गटार योजनेच्या कामासाठी वाढीव ३५.१९ कोटी, प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी वाढीव ४.४४ कोटी, लोणार-मंठा रस्ता बायपास बांधकामासाठी वाढीव २५.२० कोटी रुपयांचे काम करण्यात येणार आहे.

## इलेक्ट्रिक वाहन निर्मितीत महाराष्ट्र

मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, यापूर्वी जुलै महिन्यात झालेल्या उपसमितीच्या बैठकीत ८० हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे गेल्या दोन महिन्यात झालेल्या बैठकांमध्ये एकूण दोन लाख कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे. ज्यामुळे ३५ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. उद्योग मंत्री उदय सामंत दरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. यावेळी



मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस चहल, अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे. सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योग घटकांना त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल. स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांची रोजगारक्षमता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

टॉवर सेमीकंडक्टर कंपनी व अदानी समूह यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल जिल्हा रायगड येथे करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी तर दुसऱ्या टप्यात रूपये २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याप्रकल्पामुळे १५ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.दरम्यान, ३० जुलै २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या सेमीकंडक्टर निर्मितीच्या अतिविशाल प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प सेमीकंडक्टर निर्मितीचा राज्यातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये लवकरच ओसॅट, चिप्स निर्मिती सुरू होणार आहे. आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स व टॉवर सेमीकंडक्टर कंपनी यांच्या प्रकल्पांमुळे प्रगत सेमीकंडक्टरची निर्मिती होणार आहे. त्यामुळे याक्षेत्रात महाराष्ट्र भारताच्या अग्रस्थानी राहणार आहे. देशातील वाढती मागणी पूर्ण करणे व सेमीकंडक्टरची इकोसिस्टीम स्थापित करण्यास देखील चालना मिळणार आहे.

स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया कंपनीचा प्रकल्प पुणे येथे एकात्मिक पध्दतीने स्थापना करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण १२ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे एक हजार रोजगार निर्मिती होणार असून प्रकल्पातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रीक व्हेईकलचे निर्मिती केली जाणार आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटर कंपनीचा प्रकल्प राज्याचे इलेक्ट्रीक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत इलेक्ट्रीक वाहन निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २१ हजार २७३ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून त्यामाध्यमातून १२ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पामुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होईल.मराठवाड्यातील सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योग घटकांना त्याचा फायदा होणार आहे. इलेक्ट्रीक वाहनाच्या वापरामुळे हरितगृह वायू उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी होऊन हवेची गुणवत्ता आणि हवामान बदल कमी होण्यास हातभार मिळणार आहे.

यापूर्वी जेएसडब्ल्यु ग्रीन मोबिलीटी यांचा छत्रपती संभाजीनगर येथे इलेक्ट्रीक वाहन निर्मितीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर यांचा इलेक्ट्रीक वाहन निर्मितीमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक होणारा छत्रपती संभाजीनगर येथील दुसरा अतिविशाल प्रकल्प असून या क्षेत्राचा सर्वंकष विकास होण्यास चालना मिळणार आहे.

रेमंड लक्झरी कॉटन्स यांचा वस्त्रोद्योग धोरणांतर्गत स्पिनींग, यार्न डाइंग, विव्हींग ज्यूट, विव्हींग कॉटन, ज्यूट, मेस्टा, कॉटन ह्या उत्पादनांच्या निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त औद्योगिक विकास महामंडळ नांदगाव पेठ, जि.अमरावती येथे होणार आहे. याप्रकल्पात १८८ कोटी एवढी गुंतवणूक आणि ५५० रोजगार निर्मिती होणार आहे.

# धाराशिव जिल्ह्यात जमावबंदी शस्त्रबंदी आदेश लागू




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

धाराशिव/ सुधाकर रणदिवे : जिल्ह्यात विविध सण उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ रोजी च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून अप्पर जिल्हा दंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १ सप्टेंबर ते ३०सप्टेंबर २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृती सार्वजनिक परिसर किंवा त्यांच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे, हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा ,व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेष रित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

शारीरिक इजा होण्यास कारणीभूत ठरतील सहज हाताळता येतील अशा वस्तू बाळगता येणार नाहीत.

कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगता येणार नाहीत,

सुरक्षितता धोक्यात येईल किंवा आराजक्ता माजेल अशी चित्रे ,निशाणी, घोषणा ,फलक ,किंवा इतर कोणत्याही वस्तू जवळ बाळगता येणार नाहीत, आज किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगीशिवाय एकत्र येता येणार नाही किंवा मिरवणूक, मोर्चा काढता येणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी सभा मिरवणुका मोर्चे काढणे ध्वनिक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे,प्रभारी अधिकारी ,यांना तसेच पोलीस अधीक्षक यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे: डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १ सप्टेंबर १९५१ ला मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीच्या कोनशिला समारंभ प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संदेश दिला होता की, आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे. तसेच वर्तमानात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :२०२० ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. म्हणून संदर्भीय विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीवर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ- : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६३ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १ सप्टेंबर २०२४ ला मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल, नागसेनवन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. अभय टाकसाळ म्हणाले की, आरक्षण ही दारिद्र्य निर्मूलनाची संकल्पना नाही. तसेच केवळ आरक्षणाने सर्व समस्या सुटतील असेही नाही. निष्पक्ष वैज्ञानिक विचारांची संदर्भासहित मांडणी करताना आपणास जबाबदारी स्विकार करावी लागेल. आपण भारताचे संविधान स्वतःप्रत समर्पित केले आहे. पहिलीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ २० ते २१ टक्केच विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचतात. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. स्वतंत्र भारतात सरकार नवीन शाळा उघडताना दिसत नाही मात्र आहेत त्या बंद करण्याच्या मार्गावर असल्याचे ऐकण्यात येत आहे. गरिबांनी शिकू नये म्हणून अभ्यासक्रमातच सीबीएसई व एसबीएसई असा भेदभाव करण्यात आला आहे. तरिही गरीब व्यक्ती पोटाला चिमटा घेऊन मुलांना खाजगी शाळेत पाठवितात. देशात जन्माला आलेली बालके ही देशाची संपत्ती आहे. परंतु शिक्षणा अभावी ही संपत्ती रस्त्यावर आहे. यावर भाष्य करताना अमर्त्य सेन म्हणतात की, राजकीय इच्छा शक्ती अभावी त्यांना शिक्षण नाकारले आहे. ज्यामुळे बेरोजगारांची फौज आत्महत्या कडे वळत असल्याने शेतक-यांपेक्षा बेरोजगारांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. म्हणूनच महात्मा फुल्यांनी मोफत व शक्तीच्या शिक्षणाची हंटर कमिशन समोर मागणी केली होती. वेळोवेळी कायद्यात दुरुस्त्या करून सरकार या जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत असताना ही जबाबदारी पालकांवर सोपविण्याचा प्रयत्न करीत आहे. काँग्रेस व भाजपचे आर्थिक धोरणे ही जवळपास सारखीच आहेत. त्यात छएझ अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक कळसच आहे. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेण्यात कमी पडलो आहोत हे आता मान्य केलेच पाहिजे. याप्रसंगी डॉ. सचिन बनसोडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास शासनकर्ती जमात व्हायला सांगितले होते आपण भाषण कर्ती जमात निर्माण केली. आपण ब्राह्मणांच्या बरोबरीने शिक्षण घेऊ लागलो, सुटा बुटात राहू लागलो हे त्यांना सहन होत नाही. १३ टक्क्यात एससी च्या ५९ जाती आहेत, ज्या केवळ लाभासाठी पुढे येतात आंदोलनासाठी नव्हे! महारा सारखी एखाद्या जातीच्या बळावर आंदोलन चालत असते. म्हणून आंदोलनाची वाताहात झालेली आहे. बॅलन्स आफ पावर मध्ये पासंगालाही उपयोगात येऊ शकलो नाही. करिता झोपलेल्या ओबीसींना जागे करावे लागेल. जेणेकरून ५४ टक्के ओबीसींना २७ टक्के का? याचा ते जॉब विचारू शकतील. के जी टू पी जी आणि पी जी टू पीएचडी पर्यंतच्या शिक्षणासाठी आपण अग्रेसर असले पाहिजे. छएझ अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे काँग्रेसची पॉलिसी ही बी जे पी पुढे रेटत आहे. या बदलात चार वर्षीय पदवीधर मध्ये प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि बहुशाखीय पदवी यातील बहुशाखीय मध्ये खरी गोम आहे. जग स्पेशलायझेशन कडे जात असताना आपण कुणीकडे? खाजगी शिक्षण संस्थांच्या विस्तारीकरणात शासकीय संस्था लुप्त होत आहेत. तरीही जगाची पुनर्रचना करणारे मूल्याधिष्ठित शिक्षण दिले पाहिजे.

प्रकाश तुपे म्हणाले की, छएझ अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक प्रतिक्रांतीचे पाऊल आहे. जाती आधारित व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे चातुर्वर्ण्यासह जातीव्यवस्था बळकट करण्याचे धोरण आहे. या धोरणाच्या अंमलबजावणी साठी काँग्रेसने पहिला, दुसरा व तिसरा तर भाजपाने चौथा व पाचवा गिअर टाकला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मौलाना अबूल कलाम आझाद यांना मुस्लिम आरक्षणावर चर्चेसाठी बोलाविले होते. मात्र ते नेहरूंच्या दबावामुळे उपस्थित राहू शकले नव्हते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते बाळासाहेब गरूड म्हणाले की, छएझ अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने भारताला सुपर पावर बनविणे अपेक्षित असले तरी त्या अनुषंगाने तात्विक मांडणी पहायला मिळत नाही. गुणवत्तापूर्ण उत्कृष्ट शिक्षणाचा अभाव आहे. धर्मनिरपेक्षतेचे धिंडवडे काढले जात आहेत. सशक्तीकरणाच्या नावांवर खाजगी भांडवलदारांनी शाळा विकत घ्यायचे आहेत. इस्रोचे मंगळयान अवकाशात पाठविताना शास्त्रज्ञ पुजा करतात तर राफेल झेपावताना संरक्षण मंत्री लिंबू मिरची लावतात अशावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन कुठे गहाण ठेवला जात असेल? अशाप्रकारे जैसे राजा वैसी प्रजाजन अशी पायाभरणी झाल्यास जागतिक महासत्तेचे स्वप्न कसे साकार होईल? करिता या विरोधात एकजुटीने उभे राहिले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. ८ जुलै १९४५ ला स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत १९ जून १९५० ला औरंगाबाद येथील नागसेनवनात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली होती. त्या काळात एक कोटी साठ लाख लोकसंख्येसाठी हैदराबाद संस्थानात १७ महाविद्यालये होती तर ३ कोटी २३ लाख लोकसंख्येच्या मुंबई प्रांतात ९० महाविद्यालये होती, ही विषमता दूर करण्यासाठी औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालय स्थापन केले होते. ज्या महाविद्यालयातून आधुनिक भारताच्या जडणघडणीसाठी आवश्यक सामाजिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी विद्वत्तापूर्ण व चारित्र्य संपन्न विद्यार्थी निर्माण व्हावे, अशी अपेक्षा होती. परंतु तसे न झाल्याने मानवी चारित्र्यात न्यूनता पहायला मिळत असल्याने शील व सौजन्य नसेल तर तो माणूस हिंस्र पशूपेक्षाही क्रुर व भितीप्रद समजण्यात यावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, त्याची प्रचिती येत आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ सप्टेंबर १९५१ ला भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली होती. त्या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे. तसेच वर्तमानात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्याने आपल्या शैक्षणिक अस्तित्वाला



धोका निर्माण झाला आहे. करिता सदरील विषयावर चर्चा आयोजित केली आहे. भारताचे संविधानाच्या अनुषंगाने बोलताना केवळ संविधान असा एकेरी उल्लेख करने हे भारताचे संविधानातील कलम ३९३ चे उल्लंघन आहे. त्या कलमानुसार भारतापासून संविधान या शब्दाला वेगळे करण्याचा आपणास अधिकार नाही म्हणून तर यासाठी भारताचे संविधानात कलम ३९३ ची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. रोजगाराभिमुख शिक्षण न दिल्याने शिक्षित, उच्च शिक्षित वा अती उच्च शिक्षित बेरोजगार होऊ शकतो. परंतु सुशिक्षित व्यक्ती बेरोजगार होऊ शकतो? अशी मांडणी करणारे शैक्षणिक व्यवस्थेचे कसे अवमूल्यन करीत आहेत? याची शहानिशा केली पाहिजे. देशात सर्वत्र एक देश, एक शिक्षण व एक अभ्यासक्रम राबविला पाहिजे. यापूर्वी आंबेडकरांनी व्यवस्थेला काँग्रेस व गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले आहे? असा ग्रंथ रुपाने प्रश्न विचारला होता. आपण आता काँग्रेस व भाजपासह त्यांच्या आधाडीतील सहयोगी पक्षांनी या देशातील वंचित मूलनिवासी बहुजन समाजासाठी काय केले आहे? असा प्रश्न विचारला पाहिजे. करिता आज आपण संदर्भीय विषयावर चर्चा आयोजित केली आहे.या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बाळासाहेब गरूड, प्रकाश तुपे, केशव कांगणे, शिवराय गरूड, डॉ. व्ही. एच. कांबळे, जी. एस. कांबळे, डी. ईश्र्वरलाल, प्रा. रफीक शेख, प्रा. तेजस कांबळे, एड. अभय टाकसाळ, तुकाराम थोरात, एस. ए. कानडे, एस. ओ. इंगळे, डॉ. सुरेश मादळे, भिमराज बोर्डे, सुभाष वानखेडे, राहुल मेश्राम, संकेत चव्हाण, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे अमित खिल्लारे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारांचे वितरण

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई/विजय घनघाव : विद्यार्थ्यांना आयुष्याची दिशा दाखविण्यात शिक्षकांचे समर्पण, मार्गदर्शन आणि योगदान महत्त्वाचे असून त्यांच्यामध्ये जग बदलण्याची ताकद असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. महाराष्ट्र विविध क्षेत्रात देशात क्रमांक एकवर आहे. शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर राहण्यासाठी आपण निर्धार करुया, असे आवाहनही त्यांनी केले.

सन २०२३-२४ च्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी




निवड झालेल्या शिक्षकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुंबईत एनसीपीएच्या टाटा सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, शिक्षक आमदार किरण सरनाईक, शालेय शिक्षण प्रधान सचिव आय.ए.कुंदन, शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

# रामचंद्र बेडक्याळे भैय्या यांचा वाढदिवसाला लावणी सम्राट प्रतीक्षा सूर्यवंशी व प्राची बेळगावकर यांची उपस्थिती

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधीः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सामाजिक कार्यकर्ते, एक अष्टपैलू व्यक्तिमत्व यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वाढदिवसाला शुभेच्छांचा वर्षाव झाला. या वाढदिवस अष्टचिंतन सोहळ्याला लावणी सम्राट प्रतीक्षा सूर्यवंशी व प्राची बेळगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. काय ते डॉल्बी, काय ते रामचंद्र बेडक्याळे भैय्या, काय ती लावणी सम्राट प्रतीक्षा सूर्यवंशी, काय ती प्राची बेळगावकर, काय तो लेझर शो, काय ते डॉल्बी, काय ते फटाक्याची आकर्षकबाजी, काय ते पब्लिक सगळ एकदम ओकेच अशी जोरदार गावांमध्ये चर्चा, या वाढदिवसाला महिला, तसेच गावातील संपूर्ण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वाढदिवसाला १२०६ऑडिओ हे मुख्य आकर्षक ठरले. कोणतेही वैयक्तिक काम असो किंवा सामाजिक कार्य असो नेहमी तळमळीने सहकार्याची भूमिका दाखवतात. यावेळी ग्रामपंचायत



आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावामध्ये या वाढदिवसाच्या फार मोठा चर्चेचा विषय ठरला. संपूर्ण नागरिकांनी शुभेच्छांचा वर्षाव करून यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी विशेष मोलाचे सहकार्य अनिल कांबळे बापू, निशांत गोरे, गोरे व राजर्षी शाहू कला, क्रीडा, सांस्कृतिक मंडळ यांचे मोलाचे योगदान लाभले.

# स्टार प्रवाहचे कलाकार बाप्पाच्या सेवेत मग्न

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

थोडं तुझं आणि थोडं माझं, घरोघरी मातीच्या चुली, ठरलं तर मग, सुख म्हणजे नक्की काय असतं आणि अबोली मालिकेत बाप्पाचं जल्लोषात होणार स्वागत

गणपती बाप्पा घरी विराजमान होणार ही कल्पनाच सुखावून टाकणारी असते. त्याच्या सेवेत दहा दिवस कसे निघून जातात हे कळतच नाही. कलाकार मंडळींसाठी शूटिंगचा सेट हा घरासमानच असतो. त्यामुळे सेटवरच्या या घरातही बाप्पाचं अगदी जल्लोषात स्वागत होणार आहे. थोडं तुझं आणि थोडं माझं, घरोघरी मातीच्या चुली, ठरलं तर मग, सुख म्हणजे नक्की काय असतं आणि अबोली मालिकांचे विशेष भाग गणेशोत्सवात पाहायला मिळणार आहेत. ठरलं तर मग मालिकेत यंदा बाप्पाची प्रतिष्ठापना प्रतिमा, रवीराज आणि सायलीच्या हस्ते होणार आहे. प्रतिमा घरी परत आल्यानंतर सुभेदार कुटुंबात आनंदाचं वातावरण आहे. त्यामुळे या लाडक्या माहेरवाशिणीच्या हातून बाप्पाची स्थापना करण्याचं एकमताने



ठरवलं गेलंय. योगायोगाने सायलीच्या हातून देखिल बाप्पाची पूजा होणार आहे. त्यामुळे आनंदाने भरलेला असा ठरलं तर मगचा गणेशोत्सव विशेष भाग असणार आहे. घरोघरीत मातीच्या चुली मालिकेतही विखेपाटील कुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाचं स्वागत करणार आहेत. संपूर्ण कुटुंबाने एकत्र येत सण साजरा करण्यासारखं दुसरं सुख नाही. घरोघरी मातीच्या चुली मालिकेतही संपूर्ण कुटुंबाने एकत्र येत जल्लोष केला आहे. सुख म्हणजे नक्की काय असतं मध्ये यंदा सजावटीची जबाबदारी स्वीकारली आहे अधिराजने. योगायोगाने शिर्के पाटलांच्या वाड्याची हुबेहुब कलाकृती त्याने देखावा म्हणून रेखाटली आहे. थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतही मानसीने बाप्पाची सजावट केली आहे.

स्टार प्रवाहची अबोली मालिका म्हणजे चाळसंस्कृतीचं एक उत्तम उदाहरण. चाळीत ज्याप्रमाणे सगळी कुटुंब एकत्र येऊन सण-उत्सव साजरे करतात अगदी तसंच अबोली मालिकेतही सगळे सण उत्साहात साजरे केले जातात. यंदाही गणरायाची स्थापना करुन अबोली मालिकेची संपूर्ण टीम बाप्पाची मनोभावे सेवा करणार आहे. तेव्हा पाहायला विसरु नका स्टार प्रवाह मालिकांचे गणेशोत्सव विशेष भाग.

**स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

# आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आर.एस.गायकवाड

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : वंचित बहुजन आघाडीचे धाराशिव जिल्हा सहसचिव, महाराष्ट्र पोलीस टाईम्सचे उपसंपादक तथा संकल्प बांधकाम मजूर संघटना महाराष्ट्र राज्य धाराशिव जिल्हा अध्यक्ष आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आर. एस. गायकवाड अणदूर ता.तुळजापूर यांना सहारा चारीटेबल ट्रस्ट धाराशिवच्या वतीने दिला जाणारा सामाजिक क्षेत्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कामाची दखल घेऊन सहारा चारीटेबल ट्रस्टच्या वतीने धाराशिव येथील जत्रा फंक्शन हॉल मध्ये आयोजित शानदार कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते आर.एस.गायकवाड यांना फुले-आंबेडकर विद्वत्त महासभा महाराष्ट्र राज्य समन्वयक प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे यांच्या हस्ते सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र पोलीस टाईम्सचे मुख्य संपादक उमेश काळे, वंचित बहुजन आघाडीचे धाराशिव जिल्हा अध्यक्ष बी.डी.शिंदे, जिल्हा महासचिव बाबासाहेब जानराव,धनंजय सोनटक्के, सहसचिव, मोहन दादा बनसोडे,जिवा सेना जिल्हा अध्यक्ष नामदेव वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन माने, बाबुराव गायकवाड, जिल्हा कोषाध्यक्ष, युनुस पटेल, मुस्लिम समाज संघटना आणि वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा कार्यकारणी सदस्य व पदाधिकारी महाराष्ट्र पोलीस टाईम्सचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी राहुल कांबळे सोलापूर शहर प्रतिनिधी स्वप्निल कांबळे सह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थितीत होते.आर.एस.गायकवाड यांना सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र परिवारामध्ये सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पंढरपूर आणि मंगळवेढा शहरातील विविध विकास कामांसाठी प्रत्येकी ५ कोटी रुपये मंजूर : आ. समाधान आवताडे

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर आणि मंगळवेढा शहरातील विविध विकास कामांसाठी राज्य शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून प्रत्येकी ५ असे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यामध्ये पंढरपूर शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर २५, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी १५ लाख रुपये शिवाय मंगळवेढा शहरातील ४० तर पंढरपूर शहरातील ४७ कामांसाठी हा निधी मंजूर असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना आ. आवताडे म्हणाले कि, राज्य शासनाच्या नगरविकास विभागातील वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत पंढरपूर नगरपरिषदेच्या हद्दीतील विकास कामांसाठी ५ कोटी आणि मंगळवेढा नगरपरिषदेच्या हद्दीतील विकास कामासाठी ५ कोटी असे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाल्याचा आदेश ३ सप्टेंबर रोजी निघाला आहे. या निधीतून पंढरपूर शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकातील सुधारणांसाठी २५ लाख रुपये, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या कामासाठी १५ लाख रुपये, लिंगायत स्मशानभूमी सुधारणा साठी १५ लाख रुपये, हजरत बाराईमाम दर्ग्यातील कामांसाठी १० लाख रुपये, जिजाऊ नगर, एकता नगर, मंगळवेढा नगर,इसबावी येथील शिक्षक सोसायटी, चंद्रमा रेसिडेन्सी, बालाजी नगर,रुक्मिणी नगर, पदमशाली धर्मशाळा येथील खुल्या जागा विकसित करणे, याशिवाय २७ रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरणसाठी प्रत्येकी १० लाख रुपये, जुनी वडार गल्ली येथे सभापंडप,पद्मावती झोपडपट्टी,अण्णाभाऊ साठेनगर, विश्र्वेश्र्वर नगर, नवीन कोर्टाजवळ ख्रिस्ती कॉलनी, भगवान नगर, परदेशी नगर येथे सभामंडप बांधण्यासाठी प्रत्येकी १० लाख रुपये,मटण मार्केट येथे फुटपाथ करणे अशा कामासाठी एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना आ. अवताडे म्हणाले कि, पंढरपूर शहराबरोबर मंगळवेढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर हायमास्ट बसवणे, लतिफ़बाबा दर्गाह जवळ शादी खाना बांधकामासाठी ५० लाख रुपये, दर्गा परिसरात संरक्षित भिंत बांधणे,कृष्णानगर, संभाजी नगर, गोवे प्लॉट, दामाजी हौसिंग सोसायटी येथे पथदिवे, विजेचे खांब बसवणे, दत्तू गल्ली, खंडोबा गल्ली, पटेल घर, नागणे गल्ली, मुढे गल्ली, मोहिनी बुवा मंदिर, बुरुड गल्ली, आठवडा बाजार, रोहिदास चौक, माने गल्ली, बोराळे नाका चौक, शिवाजी तालीम, मेटकरी गल्ली, मंगळवेढा न्यायालय ते उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारखाना चौक ते बठाण रोड, खंडोबा गल्ली, माळी गल्ली, सराफ गल्ली, कोंडुभैरी गल्ली अशा भागातील रस्ते काँक्रीटीकरण, भूमिगत ड्रेनेज, नगरपालिका सभामंडप बांधणे,पत्राशेड बांधणे, नाणे वाडी येथे सभामंडप बांधणे, संरक्षक भिंत बांधणे पथदिवे बसवणे अशा विविध कामांसाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर झालेला आहे.

राज्य शासनाच्या वैशिटच्यपूर्ण योजनेतून दोन्ही शहरांसाठी हा १० कोटी रुपये निधी मंजूर केलेला आहे.

यामुळे दोन्ही शहरातील नारिकाना या निधीतून मूलभूत सुविधा मिळतील असा दावा आ. समाधान आवताडे यांनी केला आहे.

## वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून राजमाता अहिल्यादेवी २५ लाख रुपये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी १५ लाख रुपये



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे काम पंढरपूरमध्ये सुरू आहे. आ. समाधान आवताडे यांच्या माध्यमातून या स्मारकासाठी वैशिष्टयपूर्ण योजनेतून १५ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. यामुळे आता या निधीतून अण्णाभाऊंच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण होईल. गेल्या अनेक वर्षांपासून पंढरपूर येथील अण्णाभाऊंच्या स्मारकाचे काम प्रलंबित होते, ते पूर्ण होईल. **अमित दुर्योधन अवघडे, संस्थापक अध्यक्ष साहित्यरत्न प्रतिष्ठान**

# मंत्री आदिती तटकरे यांनी चेअरमन कल्याणराव काळे यांच्या वाढदिवसानिमित्त केला सत्कार



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती ताई तटकरे हे पंढरपूर दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रांतिक सदस्य तथा सहकार शिरोमणी कारखान्याची चेअरमन कल्याणराव काळे यांचा संपर्क कार्यालयात भेट देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी राष्ट्रवादीचे युवा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज दादा चव्हाण राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम व प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत आबा, महिला जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे पंढरपूर तालुकाध्यक्ष अनिल नागटिळक कार्यकारणी सदस्य नारायण शिंदे अर्जुन जाधव युवकाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय भांड यशवंतराव चव्हाण प्रसूती चेअरमन शाजेबापू साळुंखे सहकारी शिरोमणीचे संचालक मोहन नाट्य राजू बापू पाटील सिताराम महाराज साखर कारखाना संचालक महादेव देटे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी मंत्री आदित्य तटकरे यांनी कार्यकर्त्यांचा आढावा घेऊन तालुक्याच्या विकासावर चर्चा केली त्यांच्या व्यस्त कामातून संपर्क कार्यालयात भेट दिल्याबद्दल प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे यांनी त्यांचे यशोचित सन्मान व सत्कार केला

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शिक्षक दिन साजरा

## डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शिक्षक दिनानिमित्त दहावीचे विद्यार्थी आज एक दिवस संपूर्ण शाळा मुख्याध्यापक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी म्हणून विद्यार्थी शिक्षकांच्या नेतृत्वात एकदिवशीय शाळा चालवण्यात आली. यावेळी

अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या जीवनामध्ये एखादा आवडता शिक्षक आणि त्यामुळे जीवनाला कलाटणी कशी मिळाली, याबद्दल आपले स्वतःचे अनुभव विद्यार्थ्यानी आपल्या भाषणातून मांडले. त्याचबरोबर सेमी विभागातील इयत्ता चौथी व सातवीच्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित एक सुंदर डान्स परफॉर्मन्स सादर केला. त्याला विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला.

यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मा .श्री मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना आज शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले व शिक्षक हा विद्यार्थी जीवनामध्ये किती महत्त्वाचा असतो हे अनेक प्रसंगाच्या माध्यमातून त्यांनी मुलांना समजून सांगितले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी शिक्षक वेदांती मसलेकर हीने केली सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून सांस्कृतिक विभागाचे प्रमुख निशिगंधा कोळी व कल्पना स्वामी मॅडम यांनी केले.

यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, शिक्षण विभागाच्या सीईओ सौ .रूपाली शहा, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सीनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, पूजा कडबगावकर, राजकुमार गवळी, सिद्धाराम पाटील, श्रीदेवी मायनाळे, शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे आदी शिक्षक उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार इयत्ता दहावीतील विद्यार्थी शुभांगी पाटील यांनी केले.

# डुबेरे जनता विद्यालयात विद्यार्थ्यांनी केला शिक्षकां गौरव

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधीः डुबेरे येथील जनता माध्यमिक व व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षकदिन व भगवान चक्रधर स्वामी अवतार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.व्यासपीठावर डी. एच. जाधव,सोमनाथ गिरी,कचेश्र्वर शिंदे, रेखा खंडीझोड, डी. ए. रबडे,रामदास वारुंगसे ,टी. के .बहिरम,सुनिल ससाणे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन व भगवान चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन व कार्याचा परिचय समृद्धी वाजे हीने करून दिला. वाद्यांच्या गजरात ,सनईच्या सुरात मुख्याध्यापक रामदास वाजे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मुलींनी औक्षण करून सर्वांना पेढा भरविला. विद्यार्थ्यांनी भेट वस्तू व गुलाबपुष्प देऊन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव केला.इयत्ता दहावीच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी बोलतांना अध्यक्ष मुख्याध्यापक रामदास वाजे म्हणाले की,



हा दिन शिक्षकांच्या ऋणातून उतराई होण्याचा दिवस आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना अविरत ज्ञान देण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी नेहमीच प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांनी जीवनात शिक्षकांबरोबरच आई-वडिलांचा नेहमीच आदर ठेवावा असे आवाहन श्री. वाजे यांनी केले. विद्यार्थ्यांनी दिवसभर अध्यापनाचे कामकाज केले. शिकविताना आलेले अनुभव अभिरुप मुख्याध्यापक व शालेय पंतप्रधान शिवम शिंदे यांनी विषद करून शिक्षक होणे खूप कठीण काम आहे असे आपल्या मनोगतात सांगितले .काही विद्यार्थ्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कामकाज केले. शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी. आर. करपे व सोमनाथ पगार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.सुत्रसंचालन अभिरुप शिक्षिका ऋतुजा वामने, श्रावणी वारुंगसे, समिक्षा कडभाने व विद्या निमसे यांनी तर आभार पी.आर.करपे यांनी मानले. यावेळी सुषमा थोरात,सीमा गोसावी,भारती निखाडे,जयश्री गोहाड आर्दीसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# साई मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : शासनाच्या मोफत आरोग्य तपासणी अभियानांतर्गत बहुजन हिताय विद्यार्थी वस्तीगृह उमरगा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजिय करण्यात आले होते. सध्या शहरात ताप डोकेदुखी सर्दी अश्या आजारानीं लहान मुलानी दवाखाने जवळ केले आहेत. अश्या काळात वसतिगृहात राहणाऱ्या अनाथ गरजू व शिक्षणाकरिता घर सोडून लांब रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष गरज लक्षात घेऊन, शहरातील अतिशय आद्ययावत आरोग्य सुविधानी युक्त असलेल्या साई मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलने यां गरीब विद्यार्थाच्या सेवेचा वसा घेऊन स्वतः वसतिगृहात ऍम्ब्युलन्स, औषधे, फार्मासिस्ट, पेथोलॉजिस्ट, तज्ञ् डॉक्टर्स, नर्सेस इ. सर्वांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची रक्त तपासणी, जनरल चेकअप, खाज, एच बी इ.तपासून त्यांना आवश्यक औषधे दिलीत.

यां शिबिरात बालरोगतज्ञ् डॉ.संजय येळपुरे, आणि डॉ.आनंद येणेगुरे यांनी वसतिगृहतील सर्व विद्यार्थ्यांची आस्थेने विचारपूस करून आरोग्य तपासणी केली आणि त्यांना आरोग्याची, स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी व व्यायाम संबंधित मार्गदर्शन केले. याप्रसंगी वसतिगृहाचे अधीक्षक धम्मचारी प्रज्ञाजीत यांनी व विद्यार्थ्यांनी साई हॉस्पिटलचे अभार मानले.

# ईटकूर प्रशालेमध्ये केला शिक्षक दिन साजरा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील जि. प. प्रशाला इटकूर येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त इयत्ता १० वीच्य विद्यार्थ्यांनी प्रशालेतील सर्व शिक्षकांचा सन्मान करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शिक्षकांचा सन्मान करताना विद्यार्थ्यांकडून प्रत्येक शिक्षकाला एक गुलाबाचे रोपटे भेट म्हणून देण्यात आले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांच्याकडून प्रत्येक शिक्षकाला फेटा, शाल व पुष्पहार देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी




प्रमुख पाहुणे म्हणून कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी अप्पा कापसे, सचिव दत्तात्रय वाघ, सरपंच मोहरताई कस्पटे, माजी पंचायत समिती उपसभापती लक्ष्मण आडसूळ, उपसरपंच विलास गाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास पावले

या सर्वांनी शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देऊन यथोचित सन्मान केला.तसेच या वेळी गावांतील प्रतिष्ठित मंडळी, पदाधिकारी, शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बाबा ग्रुप फाउंडेशनच्या वतीने भोजनदान

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : बाबा ग्रुप फाउंडेशन च्या माध्यमातून अंकुर बाल विकास केंद्र डोंबिवली येथे मुलांना भोजन वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी बाबा ग्रुप फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव, उपाध्यक्ष सागर गायकवाड खजिनदार हरेश जाधव, सदस्य दीपक जाधव, विकास धनगर ,ऋतिक जाधव ,आदित्य जाधव उपस्थित होते.





# महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे दर्शन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याच्या महिला व बाल विकास अदिती वरदा सुनील तटकरे यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ह भ प ज्ञानेश्र्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोजशोत्री महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे, नायब तहसीलदार वैभव बुचके, विजय जाधव, अजित पवार गटाच्या सोलापूर जिल्हा महिला अध्यक्ष वर्षाताई शिंदे, तसेच मान्यवर व पदाधिकारी यांच्यासह मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते